# मुंबई कामगार मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्था मर्यादित

(बहुराज्य ग्राहक सहकारी संस्था)

## ६५ वा वार्षिक अहवाल

## १-४-२०१२ ते ३१-३-२०१३

***सहकारी बंधू-भगिनींनो,***

मुंबई कामगार मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्था मर्यादित, या बहुराज्य ग्राहक सहकारी संस्थेचा दि. 31 मार्च 2013 रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा 65 वा वार्षिक अहवाल आणि वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेली हिशेब पत्रके, ताळेबंद आपणासमोर सादर करताना आनंद होत आहे.

अहवाल वर्षाच्या सुरुवातीपासून मुक्त अर्थ व्यवस्थेमुळे परकीय उद्योगांना प्राधान्य देण्यात आले असून जगातील सर्व देशांच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रांवर याचे परिणाम दिसून येत आहेत. भारतीय बाजारपेठेच्या आर्थिक धोरणांवरही परिणाम होत आहेत.

भारत सरकारने अहवाल साली परकीय गुंतवणुकीसाठी रिटेल क्षेत्र खुले केले आहे. यामुळे रिटेलींग व्यवसायावर त्याचा परिणाम होत असून तीव्र स्पर्धा होणार आहे. खाजगी उद्योगांच्या स्पर्धेत राजकीय उदासीनतेमुळे ग्राहक सहकार क्षेत्र दुर्लक्षित होत आहे.

वस्तूंच्या **दर्जा पेक्षा ब्रँड** ची विचारणा होत आहे. यामुळे व्यवसायांवर परिणाम होत आहे. कामगार कपात, स्वेच्छानिवृत्ती, टाळेबंदी वाढत्या प्रमाणात सुरु राहिली. कामगार व मध्यम वर्ग हा संस्थेचा प्रमुख ग्राहक आधार असल्यामुळे तो कमी होऊन शाखा/डिपार्टमेंट विक्रीवरही कमी/अधिक परिणाम होत गेला. तसेच दिवसेंदिवस महागाई वाढत असून मालाचे भाव गगनाला भिडले. दुष्काळाने व महागाईने गांजलेल्या परिस्थितीमुळे महाराष्ट्रातील गोरगरीब जनता होरपळून निघालेली आहे. याच बरोबर कुपोषणासोबतही आपणांस लढा द्यायचा आहे. चांगले आरोग्य व शिक्षण यासाठीही सामाजिक बांधिलकी म्हणून प्रयत्न करावे लागतील.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात अनेक संस्था उदयास आल्या व काही लोपही पावल्या. हाताच्या बोटावर मोजता येतील अशा संस्था आपले अस्तित्व टिकवून आहेत. त्यात मुंबई कामगार मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्था मर्यादित (अपना बाजार को-ऑप.) हे नांव अग्रभागी आहे. गेली काही वर्षे अडचणीची होती परंतु त्यावर मात करुन संस्थेने आपली प्रगती कायम ठेवली. हे अभिमानाने सांगण्यास आनंद होत आहे. याचे श्रेय संस्थेच्या निःस्वार्थी सेवाभावी कार्यकर्ते, कुशल व्यवस्थापन, दुरदर्शी नेतृत्व असलेले पदाधिकारी, प्रामाणिक व मेहनती अधिकारी व सेवक वर्ग तसेच संस्थेचे मान्यवर ग्राहक, सभासद, ठेवादार आणि हितचिंतक यांना जाते.

देशाच्या संविधानातील 97 व्या घटनादुरुस्तीमधील तरतुदीच्या अनुषंगाने सहकारी संस्थांच्या उपविधीमध्ये बदल करणे अनिवार्य असून माहे फेब्रुवारी 2013 पासून नवीन नियम लागू झाले आहेत. या अनुषंगाने संस्थेनेही आपल्या उपविधीमध्ये बदल करण्यासाठी सर्वसाधारण सभेमध्ये मंजूरीसाठी प्रस्ताव केला आहे.

### विक्री व आर्थिक आढावा

अहवाल वर्षी संस्थेची विक्री उलाढाल रु. 133.60 कोटी झाली असून यामध्ये डिपार्टमेंट स्टोअर्सची विक्री 52%, शाखा विभाग विक्री 24%, कोकण विभाग विक्री 10% व होलसेल विभाग विक्री 14% आहे. अहवाल वर्षात गतवर्षीच्या तुलनेत संस्थेच्या उलाढालीत रु. 17.81 कोटी वाढ झाली आहे. प्रत्यक्षात ही विक्री बंद केलेले विभाग वगळता रु. 19.65 कोटीने वाढली आहे. बंद विभाग वगळता विक्री वाढीचे प्रमाण 17.25% आहे. याचाच अर्थ अत्याधुनिक मॉल्सच्या स्पर्धेत सुध्दा ग्राहकांनी संस्थेवर विश्वास दाखविला आहे.

## विक्री

रुपये लाखामध्ये

| क्र. | तपशील | सन 2011-12 रुपये | सन 2012-13 रुपये | विक्री वाढ/कमी रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | शाखा विभाग | 2608.42 | 3249.47 | 641.05 |
| 2 | डिपार्टमेंट स्टोअर्स | 5968.25 | 6999.77 | 1031.52 |
| 3 | कोकण | 1050.51 | 1174.74 | 124.23 |
| 4 | मडगांव (गोवा) | 106.21 | 92.52 | (-)13.69 |
| 5 | एपीएमसी (होलसेल) | 1660.85 | 1843.20 | 182.35 |
| | **एकूण (1 ते 5)** | **11394.24** | **13359.70** | **1965.46** |
| 6 | **बंद विभाग** | **184.81** | **---** | **(-)184.81** |
| | **एकूण / विक्री** | **11579.05** | **13359.70** | **1780.65** |

## भाग भांडवल व ठेवी

### अ) भाग भांडवल

31 मार्च 2013 अखेर एकूण 7244 सभासद संस्थेच्या पटावर आहेत. भाग भांडवलाची विगतवारी पुढीलप्रमाणे आहे.

| 31 मार्च 2012 | | | 31 मार्च 2013 | |
|---|---|---|---|---|
| सभासद | भाग भांडवल (रु.) 2011-12 | | सभासद | भाग भांडवल (रु.) 2012-13 |
| 15719 | 1,90,89,110 | वैयक्तिक | 7235 | 1,80,39,220 |
| 56 | 34,980 | प्राथमिक संस्था | 9 | 18,000 |
| 15775 | **1,91,24,090** | **एकूण** | **7244** | **1,80,57,220** |

संस्थेच्या उपविधीनुसार किमान भाग भांडवल रु. 1,000/- असणे आवश्यक असल्यामुळे रु. 1,000/- पेक्षा कमी भाग भांडवल असणाऱ्या सभासदांचे भाग भांडवल रु. 9,75,530/- कमी करण्यात आल्यामुळे भागभांडवलात घट झालेली दिसत आहे. तसेच अहवाल वर्षात 896 नवीन सभासद झाले व 257 सभासद कमी झाले आहेत.

### ब) सभासद ठेवी

31 मार्च 2013 अखेर संस्थेकडे सभासदांच्या रु. 804.09 लाख इतक्या रक्कमेच्या ठेवी जमा आहेत. त्याची विगतवारी पुढीलप्रमाणे

(रुपये लाखामध्ये)

| | 31 मार्च 2012 | 31 मार्च 2013 |
|---|---|---|
| मुदतठेवी | 507.74 | 82.59 |
| अक्षयठेवी | 734.95 | 721.50 |
| **एकूण** | **1242.69** | **804.09** |

अहवाल वर्षी सभासद ठेवी कमी/परतफेड करण्याच्या धोरणामुळे विशेषतः ठेवींशी संबधित सभासद भाग भांडवल व सभासद कमी झाले आहेत. रु.438.60 लाखांच्या मुदत ठेवी परत करण्यात आल्या आहेत. त्यामुळे व्याज खर्चात बचत झाली आहे.

संस्थेने खरेदी खर्चात बचत केली तसेच खरेदीमध्ये चांगला टर्न ओव्हर डिस्काऊंट मिळवून रु. 13.37 कोटीचा व्यापारी नफा मिळविला आहे. व्यापारी नफ्यात रु. 2.33 कोटींची वाढ झालेली आहे. संस्थेच्या रिकाम्या जागांचा पूर्ण वापर करुन अधिकाधिक इतर उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. याचबरोबर ग्राहकांना बँकींग, विमा व आरोग्यसेवा, यासारख्या सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. त्यामुळे संस्थेच्या ग्राहक संख्येत वाढ होत आहे.

ठेवी व बँक कर्ज कमी करुन व्याज खर्च मर्यादित करण्याचा प्रयत्न करीत आहोत. संगणकीकरण व नुतनीकरण करुन ग्राहकांना अधिक सुलभ खरेदी करता येईल अशी सोय करीत आहोत. अपना बाजार फोर्ट, मुलुंड, देवरुख व लांजा या शाखांचे नवीन करार केल्यानंतर भाडेखर्चात वाढ झाली आहे. सेवकांच्या ग्रॅच्युईटीकरिता एल. आय.सी. ग्रुप ग्रॅच्युईटी स्कीममध्ये यावर्षीच्या नफ्यातून रु. 48.61 लाख तरतूद करण्यात आली आहे. तसेच सेवकाचा संस्थेच्या सेवेत असताना मृत्यु झाल्यास त्यास पूर्ण ग्रॅच्युईटी मिळण्यासाठी आपण एल.आय.सी. कडे प्रिमियम भरत असल्यामुळे यावर्षी दुर्दैवाने निधन पावलेल्या सेवकांच्या कुटुंबियांना निवृत्तीपर्यंतचा पूर्ण ग्रॅच्युईटीचा लाभ मिळाला आहे. पुनर्मुल्यांकन निधीचा वापर पूर्वी आपण संस्थेचे तोटे वळते करण्यासाठी केला होता. गतवर्षीच्या नफ्यातून यासाठी तरतूद केल्यानंतर शिल्लक राहिलेली रु. 3 कोटी 45 लाख 35 हजाराच्या तुटीपैकी या वर्षाच्या नफ्यातून रु. 2 कोटी 37 लाख 13 हजाराची तरतूद करण्यात आली आहे. अद्यापही रु. 1 कोटी 8 लाख 22 हजाराची तूट शिल्लक असून पुढील वर्षी ही तूट भरुन संस्था निव्वळ नफा प्राप्त करु शकेल असा विश्वास व्यवस्थापनास आहे.

## नुतनीकरण व संगणकीकरण

अहवाल वर्षी अपना बाजार देवरुख, सरदारनगर, चारकोप आणि नायगांव येथे करण्यात येणाऱ्या नुतनीकरणामुळे दुरुस्ती खर्चात वाढ झालेली आहे. अहवाल साली अ.बा. दादर नागरिक शाखा व ए.पी.एम.सी. मार्केट, तुर्भे यांचे संगणकीकरण करण्यात आले. आगामी वर्षात अपना बाजार माहिम मेडीकल, सरदारनगर शाखा, नायगांव, फोर्ट, मुलुंड आणि चारकोप डिपार्टमेंट स्टोअर्सचे बारकोडींग

(संगणकीकरण) करण्याचा संस्थेचा मानस आहे. तसेच अपना बाजार फोर्ट स्टोअर्सचे नुतनीकरण करण्यात येत आहे.

### अपना बाजार चेंबूर (RCF) येथे नवीन विक्री दालन

अपना बाजार चेंबूर आर. सी.एफ वसाहतीतील शाखेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून त्याला जोडून नव्याने सुरु करण्यात आलेल्या रेडीमेड गारमेंट्स व होजिअरी दालनाच्या शुभारंभाचे आयोजनही करण्यात आले होते. या शुभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून RCF चे कार्यकारी संचालक श्री. प्रविण देशपांडे आवर्जुन उपस्थित होते. त्यांच्या समवेत श्री. एम. वी. वानकर जनरल मॅनेजर (मानव संशोधन) ही हजर होते त्यावेळी संस्थेचे मा. कार्याध्यक्ष श्री. अनिल गंगर, मा. उपकार्याध्यक्ष श्री. श्रीपाद फाटक, एक्झिक्युटिव्ह कमिटी सदस्या सौ. भारती शिरसाट हजर होत्या.

### अपना बाजार विक्री महोत्सव

सिझनमध्ये नव्या तांदळाचे पीक आणि जुन्या तांदळाची साठवणूक ही परंपरा लक्षात घेऊन अपना बाजारने तांदूळ महोत्सव दि. 1 जानेवारी 2013 ते 28 फेब्रुवारी 2013 या कालावधीत आयोजित केला होता. यामध्ये नव्या व जुन्या तांदळाचे विविध प्रकार उपलब्ध होते. महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे उत्कृष्ट दर्जा व रास्त भाव तसेच 50 किलो तांदूळ खरेदीवर फ्री होम डिलिव्हरीची सोय त्यामुळे तांदूळ महोत्सवाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. प्रतिवर्षाप्रमाणे अपना बाजारने डिपार्टमेंट व शाखामधून अख्खे मसाले व मिरची यांचा विक्री महोत्सव आयोजित केला होता. त्यालाही ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. त्याचप्रमाणे दसरा-दिवाळी सणामध्ये ग्राहकांना भेटवस्तू तसेच नाताळ व नववर्षानिमित्त ग्राहकांसाठी वेगवेगळ्या स्किम्सचे आयोजन करण्यात आले. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त दिनांक 19 ऑगस्ट 2012 ते 22 ऑगस्ट 2012 या कालावधीमध्ये ग्राहकांना खास सवलतीच्या दरात तांदूळ, गहू, तुरडाळ व तेल या वस्तूंची विक्री करण्यात आली. तसेच 15 सप्टेंबर 2012 ते 18 सप्टेंबर 2012 या कालावधीमध्ये फेस्टीवल कॉम्बो व सर्व मसाले पावडर सवलतीच्या दराने विक्री करण्यात आले. त्याला ग्राहकांनीही चांगला प्रतिसाद दिला.

### व्यवस्थापक समितीच्या सभा

अहवाल साली व्यवस्थापक समितीच्या एकूण 15 सभा झाल्या. संचालक उपस्थितीचे प्रमाण 83.49% होते.

### पाहुण्यांच्या भेटी

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष 2012 चे औचित्य साधून गोवा राज्याचे सहकार मंत्री मा. पांडुरंग (दिपक) ढवळीकर व त्यांच्या विभागातील अधिकारी यांनी दिनांक 08-11-2012 रोजी अपना बाजार अंधेरी डिपार्टमेंट स्टोअर्स येथे भेट दिली व पाहणी केली. त्यावेळी संस्थेचे मा.उपकार्याध्यक्ष श्री. श्रीपाद फाटक, एक्झिक्युटिव्ह कमिटी सदस्या सौ. भारती शिरसाट, संचालक - श्री. कृष्णा जाधव व श्री. प्रभाकर साटम उपस्थित होते.

### हार्दिक अभिनंदन

दि. 15-7-2012 रोजी संस्थेचे मा. उपकार्याध्यक्ष श्री. श्रीपाद फाटक यांनी क्षात्रकुलोत्पन्न मराठा समाजाच्या कार्यकारिणीची पंचवार्षिक निवडणूक डॉ. शिरोडकर परिवर्तन पॅनलतर्फे लढविली. त्यामध्ये त्यांचे संपूर्ण पॅनल भरघोस मतांनी विजयी झाले व त्यांची अध्यक्षपदी निवड झाली.

संस्थेच्या संचालिका श्रीमती श्वेता साठे यांना समाजशास्त्र विषयात डॉक्टरेट मिळाली.

अपना बाजार चारकोप शाखा समितीचे सदस्य श्री. हेमंत बिडवे यांचा अखिल भारतीय नाट्यपरिषदेने सर्वोत्कृष्ट कार्यकर्ता म्हणून गौरव केला. तसेच अखिल भारतीय नाट्यपरिषदेच्या बोरिवली शाखेवर खजिनदार म्हणून पुढील 5 वर्षाकरिता त्यांची नियुक्ती झाली.

मुंबई कामगार सेवक सहकारी पतपेढी लि. ची सन 2012 ते 2017 सालाकरिता पंचवार्षिक निवडणूक दि. 21-07-2012 रोजी घेण्यात आली. निवडून आलेली व्यवस्थापन समिती.

थोर समाजवादी नेते श्री. दत्ताजी ताम्हाणे यांच्या 101 व्या वाढदिवसानिमित्त संस्थेतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन !

### अशी भेसळ अशी चलाखी

अपना बाजार फोर्ट डिपा.स्टोअर्स येथे दिनांक 18-04-2013 रोजी खास ग्राहकांच्या माहितीसाठी "अशी भेसळ अशी चलाखी" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कंन्झ्युमर्स गायडन्सच्या श्री. गजानन पाटील यांनी ग्राहकांना भेसळयुक्त पदार्थापासून कसे जागरुक राहिले पाहिजे यासाठी प्रात्यक्षिक दाखविले. फोर्ट शाखा समितीचे अध्यक्ष श्री. दत्ताराम नवगांवकर यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बहुसंख्य ग्राहकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला.

## दादासाहेब सरफरे व्याख्यानमाला

दादासाहेब सरफरे व्याख्यानमाला गेली 37 वर्षे संस्थेमध्ये अव्याहतपणे चालू आहे. यावर्षीही व्याख्यानमाला दि. 21-11-2012 रोजी व दि.22-11-2012 रोजी संपन्न झाली.

दि. 21-11-2012 रोजी पोलीस निवृत्त अधिकारी (DSP) श्री. रोहिदास दुसार यांचे "मुंबई बेटाचा इतिहास अणि सहकार" या विषयावर व्याख्यान झाले. सदर व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे मा. कार्याध्यक्ष श्री. अनिल गंगर होते. मुंबईच्या सात बेटांच्या माहितीचे विस्तारीत विवेचन करुन सर्व श्रोत्यांना श्री. दुसार साहेबांनी मंत्रमुग्ध केले.

दिनांक 22-11-2012 रोजी के. ई. एम. रुग्णालयातील प्रोफेसर आणि मनश्चिकित्सा विभाग प्रमुख डॉ. शुभांगी आर. पारकर यांनी "संस्कृती आणि जीवन शैली" या विषयावर व्याख्यान देऊन श्रोत्यांना बहुमोलाचे मार्गदर्शन केले.

या व्याख्यानमालेला जोडून सभासद व सेवक पाल्यांचा गुणगौरव समारंभ आयोजित केला गेला तसेच संस्थेत 25 वर्षे सेवाकाल पूर्ण केलेल्या सेवक व अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. सदर व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक श्री. कृष्णा जाधव होते.

यावर्षी अपना बाजार संस्थेतील सेवक व अधिकारी यांच्यापैकी ज्यांनी पुढील शिक्षण घेऊन पदवी मिळविली त्यांचाही पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या सत्काराच्या मानकरी ठरल्या एच.आर.डी.विभाग प्रमुख सौ. क्रांती घरत व अ.बा.फोर्ट डिपार्टमेंट स्टोअर्सच्या फार्मासिस्ट कु. संतोषी लाड.

## दादासाहेब सरफरे आरोग्य केंद्र

संस्थेचे संस्थापक प्रवर्तक कै. दादासाहेब सरफरे यांच्या स्मरणार्थ अपना बाजार नायगांव येथे चालविण्यात येणारे "दादासाहेब सरफरे आरोग्य केंद्र" गेली 43 वर्षे अव्याहतपणे कार्यरत आहे. आरोग्य केंद्रातील तज्ञ डॉक्टरांमार्फत रुग्णांना नाममात्र दरात सेवा पुरविली जाते. या आर्थिक वर्षात 6713 रुग्णांनी या सेवेचा लाभ घेतला. आरोग्य केंद्राचे प्रमुख डॉ.प्रताप देसाई असून ते आरोग्य केंद्राची जबाबदारी समर्थपणे सांभाळीत आहेत.

गेली कित्येक वर्षे सरफरे आरोग्य केंद्रातील क्लिनिकल लॅबमधून रक्ताची मॅन्युअल तपासणी करुन टाईपरायटरवर टाईप करुन रिपोर्ट दिले जात होते. परंतु आरोग्य सेवेत पुष्कळ सुधारणा झाल्यामुळे रुग्णांच्या विश्वासार्हतेमुळेच Fully Automatic Haematology Cell Count मशीन बसविण्यात आली आहे. भौतिक उपचारासाठीही तीन मशिन खरेदी करण्यात आल्या आहेत. आरोग्य केंद्रातर्फे अपना बाजार बँक्वेट हॉल, नायगांव येथे दि.24 फेब्रुवारी 2013 रोजी हाडांच्या मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये 275 रुग्णांनी सेवेचा लाभ घेतला. त्यावेळी संस्थेचे मा. कार्याध्यक्ष श्री. अनिल गंगर, मा. उपकार्याध्यक्ष श्री. श्रीपाद फाटक, आरोग्य केंद्राचे प्रमुख डॉ.प्रताप देसाई, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. एस.टी काजळे व इतर मान्यवर उपस्थित होते.

## गुणवंत विद्यार्थी कौतुक सोहळा

अपना बाजार मुलुंड, महाराष्ट्र सेवा संघ मुलुंड, रोटरी क्लब ऑफ मुलुंड व अन्य संस्थांच्या संयुक्त विद्यमाने सरस्वती सन्मान व गुणवंत विद्यार्थी कौतुक सोहळा साजरा करण्यात आला.

मुलुंडमधील प्राथमिक, माध्यमिक 4 थी व 7 वीच्या शिष्यवृत्ती प्राप्त तसेच इयत्ता 10 वी, 12 वी आणि पदवी परिक्षेत उल्लेखनीय यश संपादित केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा दि. 29 ऑगस्ट 2012 रोजी महाराष्ट्र सेवा संघ, जवाहरलाल नेहरु मार्ग, मुलुंड (पश्चिम), मुंबई - 80 येथे संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महाराष्ट्र सेवा संघाचे अध्यक्ष श्री. च. ना. वझे होते. तसेच रोटरी क्लब ऑफ मुलुंडचे अध्यक्ष श्री. मनमोहन अग्रवाल व संस्थेचे कार्याध्यक्ष मा. श्री. अनिल गंगर कार्यक्रमात उपस्थित होते.

## रक्तदान शिबीर

अपना परिवार व क्षा. म. शिक्षण संस्था यांनी सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेतून विविध समाजोपयोगी उपक्रम राबविलेले आहेत. क्षा. म. शिक्षण संस्था ही शैक्षणिक कला-क्रिडा व लोकोपयोगी कामात नेहमीच अग्रेसर राहिलेली आहे. यंदाही वरील संस्थांच्या संयुक्त विद्यमाने अपना परिवाराचे संस्थापक, अपना बँकेचे माजी अध्यक्ष आणि सहकार चळवळीचे खंदे पुरस्कर्ते सहकार महर्षी कै.सहदेव फाटक यांच्या 89 व्या जयंती निमित्त के.ई.एम.हॉस्पिटल रक्तपेढीच्या सहकार्याने दि.3 फेब्रुवारी 2013 रोजी डॉ. शिरोडकर हायस्कूल, परेल येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात आपल्या संस्थेचा मोठा सहभाग होता. त्यावेळी अपना परिवार प्रमुख श्री. आत्माराम शिंदे, क्षा. म. मराठा समाज मुंबईचे श्री. सावळाराम नेवाळकर, संस्थेचे मा. कार्याध्यक्ष श्री. अनिल गंगर, मा.उपकार्याध्यक्ष श्री. श्रीपाद फाटक तसेच अपना

परिवाराचे कार्यकर्ते श्री.अशोक सरफरे, श्री. सुरेश जागुष्टे, श्री. बच्चुभाई शहा, श्री. पी. अे. कांबळी व इतर आजी माजी मान्यवर उपस्थित होते. आयोजित शिबिरात 275 रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदात्यांना भेटवस्तू व रक्तदान कार्ड देण्यात आले.

### सेवक आरोग्य

संस्थेच्या एच. आर. विभागातर्फे अपना बाजार को-ऑप व हॅपीटायटीझ केअर ॲडव्हायझर ऑफ ओएसीस यांच्या विद्यमाने अपना बाजारमधील अधिकारी व सेवक वर्गासाठी हॅपीटायटीझ बी तपासणी कार्यक्रम दि.15-06-2012 ते दि.25-06-2012 पर्यंत नायगांव, फोर्ट, चारकोप, अंधेरी, मुलुंड व सर्व शाखांमध्ये आयोजित करण्यात आला. त्याचा अधिकारी व सेवक वर्गाने चांगला लाभ घेतला.

### प्रशिक्षण

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील प्रबंध संस्थान पुणे यांच्या वतीने ''मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्रॅम'' दि.10-12-2012 ते 12-12-2012 या कालावधीत आयोजित करण्यात आला. या प्रशिक्षणाचा लाभ घेण्याकरिता संस्थेतर्फे श्री. संदेश राणे, श्री. संतोष गिते, श्री. किशोर रावराणे, श्री. उदय मोहिते, श्री. प्रमोद राणे व श्री. रविंद्र जाधव या अधिकाऱ्यांना पाठविण्यात आले.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील प्रबंध संस्थान पुणे यांच्यातर्फे महाराष्ट्र राज्यातील सहकारी ग्राहक भांडार यांचे अध्यक्ष व संचालक यांच्यासाठी ''नेतृत्व विकास कार्यक्रम'' दि.16-04-2013 ते 18-04-2013 या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमात संचालक श्री. सतिश लगड व श्री. नागेश तावडे यांनी सहभाग घेतला.

दिनांक 23-10-2012 रोजी संस्थेच्या एकूण 29 सेवक व अधिकाऱ्यांना कर संदर्भात प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणाच्या वेळी संस्थेचे संचालक निवृत्त विक्रीकर निरीक्षक श्री. विश्वनाथ मलुष्टे यांनी उद्‌बोधनपर मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी कायद्यानुरुप विविध संज्ञाचे स्पष्टीकरण केले. तसेच संस्थेचे कर सल्लागार श्री. अरुण केळकर (चार्टर्ड अकाउंटंट) यांनी करविषयक सविस्तर माहिती दिली.

संस्थेच्या एकूण 72 विक्रेत्यांना दि.19.11.2012 ते दि. 21.11.2012 पर्यंत विक्री कौशल्य या विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षण देण्यात आले आणि दि.19.12.2012 व दि.20.12.2012 रोजी संस्थेच्या 50 अधिकाऱ्यांना 1) Effective Selling Technique आणि 2) People Management या विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षण Edu-Bridge Learning Pvt. Ltd. संस्थेचे शिक्षण अधिकारी श्री. निलेश तुपे यांनी दिले. विविध खेळांद्वारे आणि स्लाईड शोद्वारे माहिती देऊन त्यांनी सेवक व अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन केले.

मुंबई पोलीस सुरक्षा शाखा / सुरक्षा समीकरण बैठक, मा. असि. कमिशनर ऑफ पोलीस सिक्युरिटी बॅच, प्रेरणा हॉल, पोलीस क्लब, आझाद मैदान पोलीस स्टेशनजवळ दि.13-08-2012 व दि. 28-02-2013 रोजी मुंबईतील मोठमोठ्या आस्थापना / कंपन्याच्या 300 ते 400 सुरक्षा अधिकाऱ्यांना बोलविण्यात आले होते. त्यामध्ये संस्थेच्या सुरक्षा विभागातील प्रतिनिधी हजर होते.

### विभागीय सहकार परिषद

राज्य सहकारी संघ आणि मुंबई सहकारी बोर्डाच्या वतीने सर्व प्रकारच्या सहकारी संस्थाच्या प्रतिनिधीची आठवी विभागीय सहकार परिषद दि.11 ऑक्टोबर 2012 रोजी राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या महात्मा गांधी सभागृह, परेल, मुंबई येथे घेण्यात आली. त्यावेळी मा. सहकार मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील, मा. ग्रामविकास मंत्री जयंत पाटील, मा. सहकार राज्यमंत्री श्री. प्रकाश सोळंके, आमदार श्री. विनायक मेटे, श्री. बी. डी. पारले आदि सहकार क्षेत्रातील नेते हजर होते. त्यावेळी सहकार क्षेत्रातील समस्यांबाबत या परिषदेत चर्चा करण्यात आली. अपना बाजार संस्थेतर्फे तसेच अपना बाजार ऑफिसर्स क्रेडीट सोसायटी तर्फेही परिषदेस प्रतिनिधी उपस्थित होते.

### अपना बाजार भगिनी सहकार

अपना बाजार भगिनी सहकारच्या वतीने वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या अहवाल वर्षात खालील कार्यक्रमांचे आयोजन झाले.

दि. 06-09-2012 रोजी दरवर्षीप्रमाणे विविध विषयांवर स्वतःचे अनुभव सांगण्याचा कार्यक्रम झाला. सौ. स्वाती सरफरे यांनी 'पोलीस सुरक्षा' याबद्दल आणि संचालिका डॉ. श्वेता साठे यांनी आपली पीएच.डी. पूर्ण केल्याबद्दलचे अनुभव सांगितले. दि. 30-10-2012 रोजी कोजागिरी पौर्णिमा साजरी करण्यात आली. यावेळी पाककला स्पर्धा घेण्यात आली. दि. 24-01-2013 रोजी तिळगुळ समारंभ झाला. यात मनोरंजनाचे विविध कार्यक्रम घेण्यात आले.

दि. 29-01-2013 रोजी 'स्त्रियांना कराटे शिक्षणांची किती आवश्यकता आहे' या विषयावर सौ. चेतना कोरगांवकर यांनी उद्बोधक व्याख्यान दिले. त्यावेळी त्यांनी पाककलेच्या स्पर्धेतील स्पर्धकांना बक्षिसे दिली.

दि. 08-03-2013 रोजी **''जागतिक महिला दिन''** साजरा केला. हा दिवस शाखा/डिपार्टमेंट स्टोअर्सने साजरा केला.त्या दिवशी महिलांचे फूल देऊन स्वागत करण्यात आले.

दि. 15-03-2013 रोजी सौ.जान्हवी जलिंदर यांनी महिलांसाठी फिटनेस या विषयावर व्याख्यान दिले. 'आहार व आरोग्य' याचा चार्टही दिला व 'जागतिक ग्राहक दिनही' साजरा केला गेला. दि.25-04-2013 रोजी 'चैत्र गौरी कार्यक्रम' होता. यावेळी डॉ. सौ. संगिता सपकाळे यांचे 'विविध आजार व उपाय' या विषयावर छान मार्गदर्शन झाले.

टाटा हॉस्पिटलमार्फत दि. 08-04-2013 ते दि.30-04-2013 या दिवसांमध्ये महिलांसाठी मोफत कर्करोग तपासणीचे आयोजन केले गेले. यामध्ये जवळजवळ 40 महिलांनी तपासणी करुन घेतली. याचे श्रेयही भगिनी सहकार कमिटीला जाते.

### मुंबई कामगार सेवक सहकारी पतपेढी

मुंबई कामगार सेवक सहकारी पतपेढीचे सन 2012-13 हे सुवर्ण वर्ष असून पतपेढीचे 31 मार्च 2013 अखेर भाग भांडवल रु. 4.32 लाख असून संचित व बचत ठेवी रु. 286.63 लाख आहेत. अहवाल वर्षात त्यांनी रु.289.59 लाखांचे कर्ज वाटप केले आहे. पतपेढीने गेली 10 वर्षे सभासदांना सातत्याने 15% लाभांश व यावर्षी ठेवीवर 11% व्याज दिलेले आहे. खास बाब म्हणजे पतपेढी सभासदांना कर्जावर देखील 12% व्याज आकारत असून ऑडीट वर्ग ''अ'' प्राप्त करण्यात यशस्वी झालेली आहे. याचे सर्व श्रेय पतपेढीच्या सभासदांचेच आहे.

### अपना बाजार ऑफीसर्स क्रेडीट सोसायटी

दिनांक 31 मार्च 2013 अखेरीस पतपेढीचे एकूण सभासद 78 असून भाग भांडवल रु.3.57 लाख आहे. मुदत ठेवी व संचित ठेवी रु.24.19 लाख आहेत. अहवाल वर्षात पतपेढीने सभासदांना 12% लाभांश देण्याचा प्रस्ताव केला आहे. तसेच पतपेढीला ऑडीट वर्ग ''अ'' मिळालेला आहे.

### अधिकारी-सेवक सहभाग

संस्थेच्या प्रदिर्घ वाटचालीमध्ये अधिकारी व सेवक वर्गाने अतिशय मोलाचे सहकार्य केले आहे. भारतीय कामगार सेना या मान्यताप्राप्त संघटनेचे पदाधिकारी संस्थेला नेहमीच चांगले सहकार्य देत असतात. गेली अनेक वर्षे संस्थेत सौहार्दाचे व शांततेचे वातावरण टिकविण्यात त्यांचे फार मोठे योगदान आहे.

### अपना सहकारी बँक लि.

अपना सहकारी बँकेस आता **मल्टीस्टेट बँकेचा दर्जा प्राप्त झाला** असून बँकेस महाराष्ट्रासह गोवा येथे ही शाखा उघडण्यास केंद्र सरकारने परवानगी दिली आहे. बँकेस रिझर्व्ह बँकेने संपूर्ण महाराष्ट्रासह गुजरात ,गोवा व कर्नाटकात शाखा उघडण्यास ना हरकत प्रमाणपत्र यापूर्वीच दिले आहे. सन 2012-13 या अहवाल वर्षात अपना सहकारी बँक लि. ने **एकूण आर्थिक उलाढलीचा रु.3000 कोटीचा टप्पा पार** करत प्रगतीची घोडदौड कायम ठेवली आहे. त्याच बरोबर अहवाल वर्षात कल्याण, अंबरनाथ, बदलापुर, भाईंदर येथे शाखा उघडल्या आहेत. **बँकेच्या सुवर्ण महोत्सवी शाखेचे उद्घाटन भाईंदर येथे दि. 29 मार्च 2013 रोजी झाले.** सामान्य कापड गिरणी कामगारांनी सुरु केलेल्या या सहकारी बँकेच्या 50 शाखा व्हाव्या हे आपल्या सर्वांना अभिमान वाटावे असे आहे. लवकरच बँकेच्या पुणे, म्हापसा (गोवा), उरण येथे शाखा उघडणार आहेत.

मार्च 2013 अखेर बँकेच्या एकूण ठेवी **रु.1861.29 कोटी** झाल्या आहेत. तर एकूण **शिल्लक कर्जे रु.1187.38 कोटी** झाली आहेत. अहवाल वर्षात बँकेचे **खेळते भांडवल रु.2184.11 कोटी** झाले आहे. तसेच **भाग भांडवल रु.74.03 कोटी** झाले आहे. **स्वनिधी रु.278.19 कोटी आहे.** तर **सिआरएआर (CRAR) 15.79%** आहे. मार्च 2013 अखेर बँकेस **ढोबळ नफा रु.20.14 कोटी** झाला आहे. अहवाल साली संचालक मंडळाने सभासदांना **15%** लाभांश देण्याची शिफारस करुन सभासदांना जास्तीत जास्त लाभांश देण्याची परंपरा कायम राखली आहे.

### आभार

भारत सरकारचे मा. कृषीमंत्री श्री. शरदचंद्रजी पवार तसेच महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री पृथ्वीराजजी चव्हाण यांच्या सहकार्य व मार्गदर्शनाबद्दल संस्था त्यांची ऋणी आहे.

### केंद्र शासन व राज्य शासन यांचे सहकार खाते व इतर शासकिय विभाग

भारत सरकारचे जॉईट सेक्रेटरी व केंद्रीय निबंधक (सहकारी संस्था) डायरेक्टर, महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त,

कृषी पणन संचालक, पुणे, जॉईंट रजिस्ट्रार, ओल्ड कस्टम हाऊसचे अधिक्षक, जिल्हा उपनिबंधक, काऊन्सिल फॉर फेअर बिझिनेस प्रॅक्टीस, अन्न व औषध भेसळ प्रतिबंध प्रशासन आणि उपनियंत्रक, शिधावाटप खात्याचे विभागीय अधिकारी, सिडकोचे अधिकारी, भाभा अणुसंशोधन केंद्र अणुशक्तीनगर, बांधकाम सेवा व इस्टेट व्यवस्थापन संचालनालय, राष्ट्रीय केमिकल्स अॅण्ड फर्टिलायझरचे चिफ मेडिकल ऑफिसर, डेप्यु.जनरल मॅनेजर, महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रिज अॅण्ड अॅग्रीकल्चर, NCUI केंद्र शासन व राज्य शासन यांचे सहकार खाते व इतर शासकिय विभागांचे अधिकारी यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल संस्था आभारी आहे.

**लोकप्रतिनिधी**

खासदार श्री.एकनाथ गायकवाड, खासदार श्री.संजीव नाईक, खासदार श्री.संजय दिना पाटील, आमदार श्री.कालीदास कोळंबकर, नामदार श्री.सचिनभाऊ अहिर, नगरसेवक श्री.संजय ऊर्फ नाना आंबोले, नगरसेवक श्री.सुनील मोरे, नगरसेविका श्रीमती पल्लवी मुणगेकर, या सर्वांच्या सहकार्याबद्दल संस्था आभारी आहे.

**महापालिका / म्हाडा**

मुंबई महानगरपालिका व त्यांचे सर्व अधिकारी व नवी मुंबई महानगरपालिका व त्यांचे सर्व अधिकारी तसेच म्हाडाचे सर्व अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार.

**बँका**

अपना सहकारी बँक लि. चे अध्यक्ष श्री. दत्तारामजी चाळके, उपाध्यक्ष श्री. सदानंद शानभाग, सर्व संचालक, प्रमुख व्यवस्थापक व त्यांचे सहकारी, बँक ऑफ महाराष्ट्राचे पदाधिकारी, अधिकारी व त्यांचे सहकारी, मुंबै बँकेचे अध्यक्ष, एम.डी. आणि संचालक मंडळ यांची संस्था आभारी आहे.

**पोलीस खाते**

मुंबई पोलीस आयुक्त आणि पोलिस खात्यातील अधिकारी व भोईवाडा पोलीस स्टेशन यांचे आभार.

**इतर संस्था**

युसुफ मेहेरअली सेंटरचे डॉ.जी.जी.पारीख, कृषी उत्पन्न बाजार समिती नवी मुंबई, राष्ट्रीय मिल मजदूर संघ, वारणा बाजार, रायगड बाजार, जनता केंद्र, ताडदेव, स्वाधार केंद्राच्या श्रीमती इंदूमती खानोलकर, LIC च्या इस्टेट विभागातील प्रांतीय अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी संस्थेला वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

**प्रसिध्दी माध्यम**

महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, सकाळ, लोकमत, नवशक्ति, नवाकाळ, सामना, प्रहार, पुढारी, वृत्तमानस, रत्नागिरी टाईम्स, सागर वार्ताहर, आपलं महानगर, तरुण भारत, आजची नवी मुंबई, नवे शहर, लोकदृष्टी,सहकार, सहकारी महाराष्ट्र (पुणे), साधना साप्ताहिक व लोकप्रभा यांचे संपादक, दैनिक नवप्रभा, दैनिक गोमांतक, दैनिक राष्ट्रमत, आकाशवाणी व दूरदर्शन वृत्त विभाग प्रमुख आणि झी.टी.व्ही., ई.टी.व्ही., या वाहिन्यांचे पदाधिकारी यांनी वेळोवेळी संस्थेच्या कार्यक्रमाला प्रसिध्दी देवून सहकार्य केले. त्याबद्दल संस्था आभारी आहे.

**वैधानिक लेखापरिक्षक**

वैधानिक लेखापरिक्षक मे. संजय राणे अॅण्ड असोसिएटस् (चार्टर्ड अकाउंटंटस), कर सल्लागार मे. पी. एम. दळवी अॅण्ड कंपनी (चार्टर्ड अकाउंटंटस्), टॅक्स ऑडीटर्स मे.एस.एस.राणे अॅण्ड कंपनी (चार्टर्ड अकाउंटंटस) यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल संस्था आभारी आहे.

आमचे मान्यवर ग्राहक, भागधारक, ठेवीदार व हितचिंतक यांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करुन हा अहवाल पूर्ण करीत आहोत.

*जय हिंद । जय महाराष्ट्र ।। जय सहकार ।।।*

| | | |
|---|---|---|
| **एस. टी. काजळे** | **श्रीपाद जगन्नाथ फाटक** | **अनिल गोविंदजी गंगर** |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपकार्याध्यक्ष | कार्याध्यक्ष |